# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/७३/२०१४-१५/३२ दिनांक : ६/७/२०१५

## आदेश केस क्र. ७३/१४-१५

१) मे. मेनन पिस्टन रिंग्ज प्रा.लि.
१९७/ ए, संभापूर-कासारवाडी रोड, - अर्जदार
टोप, जिल्हा : कोल्हापूर

**विरुध्द**

१) अधीक्षक अभियंता (कोमं)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर
२) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,. - विरुद पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## न्याय निर्णय

श्री. जी.बी.पानकर, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.
या तक्रारीतील तक्रारदार हे वितरण कंपनीचे उच्चदाब औद्योगिक ग्राहक आहेत.

मे. मेनन पिस्टन रिंग्ज प्रा.लि. - केस क्र. ७३/१४-१५

तक्रारदार हे वितरण कंपनीचे उच्चदाब औद्योगिक ग्राहक आहेत. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केस क्र.४४/२००८ मधील दि.१२.०९.२००८ आदेशानुसार ग्राहकास हवा तो पर्याय कन्टीन्युअस अथवा नॉन-कन्टीन्युअस स्वीकारण्याचा अधिकार आहे.

मा. आयोगाच्या सदर आदेशास अनुसरुन वितरण कंपनीने वाणिज्य परिपत्रक क्र.८८ दि.२६.०९.२००८ रोजी जारी व लागू केले, त्यामध्ये ग्राहकाला हवा तो पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आली आहे. मा.आयोगाच्या केस क्र.१९/२०१२ मधील दि.१६.०८.२०१२ च्या आदेशानुसार ग्राहकाने नॉन-कन्टीन्युअसचा पर्याय स्वीकारला व तसे लेखी पत्र दि.१०.१०.२०१३ रोजी वि.प.ला दिले. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार वि.प.ने केलेली जादा दराची आकारणी संपूर्णपणे चुकीची, बेकायदेशीर, मा. आयोगाच्या आदेशा व कृती मानके विनियमांच्या विरुध्द आहेत. वि.प.ने कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वर्गवारी बदलाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर पुढील देयक चक्रापासून नॉन-कन्टीन्युअस दराने आकारणी करणे आवश्यक होते. तक्रारीतील पॅरा ३ मध्ये कृती मानके विनियम २००५ मधील अधिनियम ९.२ चा संदर्भ घेऊन पुढील देयक चक्रापासून वर्गवारी बदलणेत यावी अन्यथा विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई मिळणेचा ग्राहकाचा अधिकार आहे. विद्युत कायदा २००३ मधील कलम ६२.६ नुसार परताव्याच्या रकमेवर व्याज मिळावे अशी ग्राहकाने मागणी केली आहे. ग्राहकाने मा.आयोगाच्या केस क्र.१११/२००९ मधील दि. १२.०९.२०१० च्या आदेशाचा संदर्भ घेतला आहे. मंचाकडून अपेक्षित मदत - मा.आयोगाचे आदेशानुसार व कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वर्गवारी बदलासाठी ग्राहकाने अर्ज केल्यानंतर पुढील देयक चक्रापासून नॉन-कन्टीयन्युअस दराने आकारणी करुन फरकाची रक्कम व्याजासह मिळवी, विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई मिळावी अशी मागणी ग्राहकाने केली आहे. वितरण कंपनीने प्रस्तुत ग्राहकाचा वर्गवारी बदलासाठीचा अर्ज दि.२३.०८.२०१३ ला मिळाल्याचे मान्य केले. त्यांनी सदरचा वर्गवारी बदलाचा प्रस्ताव मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांना पाठविण्यात आलेला असून तो अद्याप प्रलंबित आहे. सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर योग्य ती कार्यवाही करणेत येईल असे नमूद केले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर सुनावणीस दि.२१.११.२०१४ रोजी घेण्यात आली. तक्रारदार प्रतिनिधी श्री.प्रताप होगाडे उपस्थित. वितरण कंपनीतर्फे श्री. आरळी, उपकार्यकारी अभियंता, कोल्हापूर मंडल हे उपस्थित होते. श्री. होगाडे यांनी आपल्या तोंडी युक्तीवादात अर्जात कथन केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा एक्स्प्रेस फिडरवर नाही, कृती मानके विनियमातील अधिनियम ९.२ नुसार वर्गवारी बदलण्याची कार्यवाही केली नाही. तसे आदेश मंचाने वितरण कंपनीस द्यावे, विलंबापोटी भरपाई मंजूर व्हावी, फरकाच्या रकमेवर व्याज मिळावे अशी मागणी केली. तसेच केस क्र. ६५ ते ६८ या चार तक्रारीसोबत दिलेले लेखी निवेदन आपल्या म्हणण्यापुष्ट्यर्थ सादर केले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांनी तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे कृती मानके विनियम २००५ मधील अधिनियम ९.२ नुसार वर्गवारी बदलून फरकाच्या रकमेचा परतावा मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या लेखी व मंचासमोर तोंडी कथनानुसार या तक्रारीतील ग्राहकांने दि. २३.०८.२०१३ रोजी नॉन-कन्टीन्युअस पर्याय स्वीकारल्याचे वितरण कंपनीस कळविले आहे. प्रस्तुत वर्गवारी बदलाचे अर्ज मंजुरीसाठी वि.प.च्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविले असून ते प्रलंबित आहेत. वि.प.ने परिपत्रक क्र. १७५ दि. ०५.०९.२०१२ मा. आयोगाच्या आदेशानुसार काढले आहे. तक्रारीत उल्लेख केल्याप्रमाणे मा.

आयोगाचे केस क्र. ४४/२००८ मधील दि. १२.०९.२००८ च्या आदेशाने दिलेले स्पष्टीकरण हे टॅरिफ ऑर्डरला लागू आहेत.

Unless they are specifically contrary to anything that has been stated in the said Order, wherein the clarification in this Order shall prevail.

त्यामुळे मा. आयोगाच्या आदेशानुसार एक महिन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. वि.प.च्या वाणिज्य परिपत्रकानुसार अर्ज मुदतीत आहे हे ग्राहकाचे व ग्राहक प्रतिनिधींचे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही. या मंचाने दि. १८.०६.२०१४ रोजी ३५ केसेसमध्ये दिलेले आदेश यामध्ये मा. आयोगाचे आदेशानुसार एक महिन्यात वर्गवारी बदलासाठीचा अर्ज करणे जरुरी आहे असे निरीक्षण केले आहे. हे आदेश ग्राहकाचे अपील क्र. ६६/२०१४ व केस क्र. १००/२०१४ मधील मा. लोकपाल यांचे दि. ०२.१२.२०१४ चे आदेशात मान्य केले आहे/ ग्राह्य धरले आहे, कारण त्या आदेशानुसार अधिनियम ९.२ नुसार Second billing cycle पासून वर्गवारी बदलून फरकाची रक्कम देण्याचे आदेश दिले आहेत व अपील अंशतः मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे श्री. होगाडे यांचे म्हणणे दि. १०.१०.२०१३ चे अर्ज हे मुदतीत आहेत त्यामुळे वर्गवारी बदलून फरकाची रक्कम मिळावी हे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही. लेखी म्हणण्यासोबत व मंचासमोर कथन केल्याप्रमाणे वि.प.चे दि. २८.०६.२०१३ किंवा सेंच्युरी रेयॉन या केसमधील दि. २८.०२.२०१३ चे आदेश अथवा अधीक्षक अभियंता, अकोला यांचेकडे दि.०६.११.२०१२ च्या पत्राने ६ केसेमधील अर्ज मुदतीत आलेने नसतांनाही ते मंजूर केले, या कारणावरुन वि.प. प्रस्तुत ग्राहकांबाबत भेदभाव करु शकत नाही, हे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही. कारण की, मा. लोकपाल यांचे अपील क्र. ६६ ते १०० मधील दि. ०२.०१२.२०१४ च्या आदेशातील पान क्र. १५ पॅरा ३५ मध्ये -

Therefore, the order of exercising option within a month from the date of tariff order prevails. The order issued by the Commission is binding on the consumers as well as the distribution licensees. The Respondent has taken a stand that period of one month mentioned in their circular dated 26th August, 2008 was in peculiar circumstances and it can not be extended in respect of subsequent tariff orders. If that is so, it is not understood as to how the Respondent considered applications of the consumers which were made after 16th September, 2012. All such applications made by the Appellants after a period of one month were forwarded by the Superintending Engineer to the Head Office and the Head Office has given approval by letter dated 25th March,2013. The said letter states that effective date in change of tariff category from continuous to non-continuous in respect of the Appellants may be given from next month from the date of the approval. If the stand of the Respondent is that such application can not be made after a period of one month from the date of tariff order, the Respondent was also bound by the order of the Commission. The Respondent seems to have waived this condition of the Commission by their own conduct by giving approval on 25th March, 2013.

थोडक्यात, वितरण कंपनी भेदभाव करते या कारणावरुन मुदतबाह्य अर्ज मंजूर करता येणार नाही, त्यानुसार वर्गवारी बदलून देता येणार नाही.

श्री. होगाडे यांनी नागपूर खंडपीठाच्या रिट पिटीशन क्र. ५४३७/२०१३ मधील दि. १०.०९.२०१४ च्या आदेशाचा संदर्भ घेऊन वर्गवारी बदलून फरकाची रक्कम मिळावी अशी मागणी केली आहे. ग्राहक तक्रार निवारण मंच, अमरावती परिमंडळ, अकोला यांनी ऑक्टोबर २०१२ मध्ये ग्राहकांनी वर्गवारी

बदलण्यास दिलेल्या अर्जावर दि. ०१.०८.२०१२ पासून वर्गवारी बदलण्याचे आदेश दिले, त्या अर्जदारांस वि.प.च्या मुख्य कार्यालयाने दि. २७.०२.२०१३ पासून वर्गवारी बदलास मंजुरी दिली होती.वि.प.ने ग्राहक मंचाच्या या आदेशाविरुध्द उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. ५४३७/२०१३ दाखल केले होते. वि.प.चे परिपत्रक क्र. १७५ दि. ०५.०९.२०१२ नुसार एक महिन्यात पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे. वरील आदेशातील पान क्र. ५ वर मा. उच्च न्यायालयाने केलेल्या निरीक्षणानुसार दि. ०६.११.२०१२ ला वि.प.चे स्थानिक अधिकारी यांनी मुख्य कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविला, त्यास दि. २७.०२.२०१३ रोजी मंजुरी मिळाली. वि.प.ने ग्राहकाचा प्रस्ताव हा सदर ग्राहकाने परिपत्रकाच्या तारखेपासून एक महिन्यात पर्याय स्वीकारला असे गृहीत धरुन पाठविला होता.

Considering the specific stand taken by the petitioner in its reply to the complaint along with communication dated 06.11.2012, it can not be said that the respondent no. 2 - Forum has recorded a perverse finding. Said finding is based on communication dated 06.11.2012 issued by the petitioner itself. Moreoever, it is not the case of the petitionere that the communication dated 06.11.2012 had been wrongly issued. The main point raised by the Company before Hon'ble High Court that Circular No. 175 dated 05.09.2012 did not permit exercise of choice within one month from its issuance. However, considering the reply filed by the petitioner before the Grievance Forum and its own letter dated 06.11.2012, I am not inclined to go into said question. In the facts of the present case, adjudication of said issue is not called for considering the specific stand taken by the petitioner before the Forum. It is however clarified that it would be open for the petitioner to urge such question if so advised in an appropriate case and <u>this judgment would not operate as precedent for said purpose.</u>

मा. उच्च न्यायालयाचे आदेश हे कनिष्ठ न्यायालयावर बंधनकारक असतात असा वेगळा अर्थ काढता येणार नाही.

या दोन्ही तक्रारीतील ग्राहकाची मागणी कृती मानके विनियम २००५ मधील अधिनियम ९.२ नुसार Change of tariff category साठी पात्र असल्याने अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून " देयकाचे दुसरे चक्र संपण्यापूर्वी वितरण परवानेधारक नावातील बदल किंवा वीज दर वर्गवारीतील बदल अंमलात आणेल " अशी तरतूद आहे.

या मंचाने केस क्र. ८९ ते १२३ या ३५ केसमध्ये दि. १८.०६.२०१४ च्या आदेशात अर्जदारांची मागणी अर्ज मुदतीत नसल्याने फेटाळली आहे. ग्राहक मंचाच्या या निर्णयाविरुध्द अर्जदार ग्राहकांनी मा. लोकपाल यांचंकडे याचिका क्र. ६६ ते १०० दि. २१.०८.२०१४ ला दाखल केली. त्यामध्ये दि. ०२.१२.२०१४ रोजी आदेश झाले. सदर आदेशात पॅरा ३६ ते ३९ मध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे -

Therefore even it is assumed that applications of the appellants were not within the period of one month from the date of tariff order dated 16.08.2012, the Appellants would be alterenatively entitled for reliefs as per the provision of the SOP Regulations.

वि.प.च्या हरकतीची दखल पॅरा ३८ मध्ये घेऊन ती फेटाळण्यात आली. आदेशातील पॅरा ४१ पान क्र. १८ वरील निरीक्षणानुसार -

त्या तक्रारीतील अर्ज हे दि. २४.०९.२०१२ ते ०६.१०.२०१२ या काळातील अर्ज हे कृती मानके विनियम २००५ मधील अधिनियम ९.२ नुसार वर्गवारी बदलणेसाठी आहेत असे गृहीत धरुन ३

The applications filed by the Appellants during the period from 24th September,2012 to 6th Oct.2012 will have to be treated as applications as per Regulatioin 9.2 of the SOP Rgulations for change of tariff category from continuous (HT-I-C) to non continuous (HT-I-N) and will have to be given effect to by the Respondent before the expiry of the second billing cycle.

**ग्राहकाने दि.२३.८.२०१३ रोजी वर्गीकरणासाठी अर्ज दिलेला आहे. प्रस्तुतच्या केसमध्ये मुख्य कार्यालयाने अद्याप मंजुरी दिलेली नाही.**

मा. आयोगाचे केस क्र. १९/२०१२ मधील दि.१६.०८.२०१२ च्या आदेशानुसार व वि.प.चे वाणिज्य परिपत्रक क्र. १७५ दि.०५.०९.२०१२ नुसार अर्जदाराचे वर्गीकरणाचे अर्ज निश्चितपणे एक महिना मुदतीत नाहीत.

मा. विद्युत लोकपाल यांनी रिप्रेझेंटेशन नं. १३५, १३८/२०१४ दि. २७.०२.२०१५ तसेच रिप्रेझेंटेशन नं. १३९, १४०/२०१४ दि. ०२.०३.२०१५ च्या आदेशामध्ये ज्या ग्राहकांच्या अर्जावर वितरण कंपनीकडून अद्याप निर्णय झाला नसेल, अशा प्रकरणी निर्णय देणे योग्य होणार नाही असे मत व्यक्त केले. अशी प्रलंबित प्रकरणे वितरण कंपनीने दोन महिन्यात निर्णय घ्यावा असा आदेश देण्यात आलेला आहे.

या केसमध्ये अर्जदार ग्राहकाचा दि. २३.०८.२०१३ चा अर्ज आहे. प्रस्तुतच्या केसमध्ये मुख्य कार्यालयाने अद्याप मंजुरी दिलेली नाही, त्यामुळे प्रश्नाचे उत्तर नकारार्थी देणेत आले आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार क्र.७३/१४-१५ प्रकरणी वितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयाने या आदेशानंतर दोन महिन्यात निर्णय घ्यावा.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

(जी.बी.पानकर)
सदस्य सचिव